# दि आजरा अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक लि., आजरा (मल्टी-स्टेट)

३९३, बी, मेन रोड आजरा, ता. आजरा, जि. कोल्हापूर

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

आपल्या बँकेच्या सर्व भागधारक सभासदांना कळविणेत येते की, बँकेची त्रेसष्ठावी वार्षिक सर्वसाधारण सभा **बुधवार दि.२७ सप्टेंबर २०२३ रोजी दुपारी ठीक २.०० वाजता ''अण्णा भाऊ सांस्कृतिक सभागृह, आजरा हायस्कूल, आजरा''** येथे आयोजित केली आहे. तरी सदर सभेस वेळेवर आपण उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील विषय**

१) दिनांक २८/०९/२०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दिनांक ३१ मार्च २०२३ अखेर संपलेल्या वर्षातील बँकेच्या कामकाजाचा अहवाल व बँकेच्या कंन्करंट/अंतर्गत/वैधानिक लेखापरीक्षकांनी तपासलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रके यावर चर्चा करुन तो स्विकृत करणे.

३) बँकेच्या वैधानिक लेखापरीक्षकांचा सन २०२२-२०२३ सालच्या लेखापरीक्षण अहवालाची माहिती घेणे व तो स्विकारणे व सन २०२१-२०२२ सालच्या दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे.

४) सन २०२२-२३ मध्ये अंदाजापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे.

५) सन २०२३-२४ सालाकरिता रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ने वैधानिक लेखापरीक्षक एस.के.वाय.जी.डी.पी.अँड असोसिएट्स यांच्या नियुक्तीस मंजुरी दिली आहे. त्यास मान्यता देणे व मेहनताना ठरविणे.

६) संचालक मंडळाने सन २०२२-२३ या वर्षाच्या शिफारस केलेल्या निव्वळ नफा विभागणीस व लाभांश वाटणीस मान्यता देणे.

७) सन २०२३-२०२४ या वर्षासाठीच्या संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे. तसेच प्रस्तावित भांडवली खर्चाची माहिती घेणे.

८) सन २०२४-२०२५ सालाकरिता समवर्ती हिशोब तपासणीस नेमणूकीचे अधिकार संचालक मंडळास देणे व सन २०२३-२०२४ वर्षासाठी केलेली नेमणूक व मानधन याची नोंद घेऊन मंजुरी देणे.

९) एकरकमी कर्ज परतफेड व इतर योजनेअंतर्गत व्याज व इतर वसूली खर्चात सूट रक्कमेस व दीर्घकाळ थकीत असलेली कर्ज खातील निर्लेखीत करणेस मंजुरी देणे व बँकेने तयार केलेल्या एकरकमी कर्ज परतफेड योजनेस मंजूरी देणे.

१०) संचालक मंडळाने सुचवलेल्या पोटनियम दुरूस्तीस मान्यता देणे.

११) बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.

१२) या वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीला मान्यता देणे.

१३) माननीय अध्यक्षांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

आजरा<br>
दिनांक: ०८/०९/२०२३

**श्री. प्रशांत यशवंत गंभीर**<br>
मुख्य कार्यकारी अधिकारी<br>
संचालक मंडळाचे हुकुमावरुन

**विशेष सूचना-** ज्या सभासदांना कामकाजासंबंधी प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी लेखी दि.२३ सप्टेंबर २०२३ पर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयात/शाखेत किंवा बँकेच्या ajarabank@ajarabank.com या मेल आयडीवर पाठवून द्यावेत. गणपूर्ती अभावी सभा तहकुब झाल्यास त्याचदिवशी, त्याच ठिकाणी दुपारी २.३० वाजता ही सभा घेतली जाईल व त्यास गणपूर्तीची आवश्यकता नसेल. तरी सभेस बँकेच्या सभासदांनी उपस्थित रहावे ही विनंती.

**सभासदांसाठी महत्वाची सूचना**

**सूचना-** १) बँकेच्या अहवालाची प्रत व पोटनियम दुरूस्तीची प्रत बँकेच्या शाखांमध्ये उपलब्ध आहे. २) अहवालाची प्रत बँकेच्या वेबसाईट www.ajarabank.com वर उपलब्ध आहे.